NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २४.११.२०२६ मंगळवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २३.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून एकुण ३,७७०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. त्याचप्रमाणे, दिनांक २३.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २४.११.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०१ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पिडींग कलम ११२/१८३ मोवाका अन्वये ०० केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ३९ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये ०६ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १६७ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ४३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ३३ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १५ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ६७ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०७ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २६ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये १५ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,१५२ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४ (सि) अन्वये ११ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २५ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,८४० वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ४,१४,२००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा युनिट क्र. ०६ पथक पोलीसांची कामगीरी :– वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ३०.०९.२०२६ चे ०२.०० वा. ते दिनांक ०१.१०.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, इंदोरा, शिव मंदीरचे मागे, अनिल रहाटेचे घरासमोर राहणारे फिर्यादी नामे सद्दाम शकील कुरेशी, वय २६ वर्षे यांनी त्यांची बजाज पल्सर–२२० दुचाकी क्र. एम.एच ४९ डि.सी २०५७ किंमती १,३०,०००/–रू. ची आपले राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ०६ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व गोपनिय माहितीवरून आरोपींना निष्पन्न केले व आरोपी नामे सुजल बंडूजी डोंगरे, वय २१ वर्षे, रा. घर

नं. ३२, वैष्णोदेवी नगर, कळमना, नागपूर यास ताब्यात घेतले. आरोपीस गुन्हेसंबंधाने विचारपुस केली असता, त्याने त्याचे पाहीजे इतर दोन साथीदारांसह संगणमताने वाहन चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन नमुद गुन्ह्यातील चोरी केलेले दुचाकी वाहन किंमती अंदाजे १,३०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे साथीदारांचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे, सपोनि. सचिन गायकवाड, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा. भगवान बुधवंत, नारयण पारवेकर, चंद्रशेखर भारती, पोअं. रविंद्र राऊत, लक्ष्मीकांत सोनटक्के व राहुल पाटील यांनी केली.



<u>३) नविन कामठी पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>

दिनांक २४.११.२०२६ चे ०४.४५ वा. ते ०६.३० वा. चे दरम्यान, नविन कामठी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, जबलपूर हायवे वरील लिहीगाव अंडरपास जवळ एका काळ्या रंगाच्या ऑटोमध्ये दोन ईसम एम.डी पावडर विक्रीकरीता बसून आहेत. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी जावून पाहणी केली असता, तेथे एक काळ्या रंगाचा ऑटो क्र. एम.एच ४९ ए.आर ७४५३ उभा असलेला व त्यामध्ये दोन इसम मिळून आले. पंचासमक्ष त्यांना त्यांची नावे व पत्ता विचारले असता, त्यांनी १) सोहेल शेख शकील अहमद, वय २६ वर्षे, रा. चॉदणी चौक, हसनबाग, नंदनवन, नागपूर २) शेख रजाक शेख रियाज, वय २६ वर्षे, रा. हसनबाग, गल्ली नं. ०२, कब्रस्तान जवळ, नंदनवन, नागपुर असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्यांचे ताब्यातील ऑटो व अंगझडती घेतली असता, सोहेल शेख याचे ताब्यात एका झिपलॉक पन्नीत एकुण ४.५४ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी एम.डी. पावडर विक्रीकरीता थांबले असल्याचे सांगीतले. दोन्ही आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०४ मोबाईल व एक बजाज कंपनीचा ऑटो असा एकुण १,२७,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे नविन कामठी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. महेश आंधळे, पोउपनि. योगेश नाल्टे, पोअं. विवेक दोरशेटवार, सुरज, तुषार व आशिष यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २४.११.२०२६ चे ०४.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा आतेभाऊ नामे प्रियांशु प्रकाश भटकर, वय २३ वर्षे, रा. कोलबा स्वामी सोसायटी, गंगा नगर, गिट्टीखदान, नागपूर हा त्याचे दुचाकीने आपले कामावरून घरी जात असता, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, गंगा नगर, बुधवार बाजार चौक येथे कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे आतेभावाचे दुचाकीला धडक देवून, त्यांना गंभीर जखमी करून, घटनास्थळावरून पळून गेला. पोलीसांनी गंभीर जखमी यास उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी अनिकेत विजय वानखेडे, वय ३३ वर्षे, रा. प्लॉट नं. ५६, धैर्यशिल सोसायटी, दाभा, गिट्टीखदान, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे सपोनि. सचिन खुटवळ ९०९६९५३२८६ यांनी अज्ञात वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

२) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :– नायलॉन मांजा बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २३.११.२०२६ चे १८.०० वा. ते १८.३५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर पोलीसांचे तपास पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत विनोबा भावे नगर, गल्ली नं. १५ येथे राहणारा ईसम नामे अवंशु अंबादे हा त्याचे राहते घरून शासनाने प्रतीबंधीत केलेला नायलॉन मांजा विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे एक इसम मिळुन आला. त्यास नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नावे अवंशु गोरखनाथ अंबादे, वय २० वर्षे, रा. घटनास्थळ असे सांगीतले. त्याचे राहते घराची पाहणी केली असता, तेथे एका बोरीमध्ये शासनाने प्रतीबंधीत केलेला नायलॉन मांजा मोनो काईट लेबल असलेल्या मांजाच्या एकुण १८ चक्री व मोनो फिल गोल्ड लेबले असलेल्या ०२ चक्री मिळुन आल्या. आरोपीचे ताब्यातुन नायलॉन मांजाच्या एकुण २० चक्री किंमती ३०,०००/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीचे कृत्य हे कलम २२३ भा.न्या.सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम– १९८६ अन्वये होत असल्याने, फिर्यादी सर तर्फे पोअं. शितेश चौरसिया यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे जरीपटका :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २२.११.२०२६ चे ०८.३० वा. ते २३.११.२०२६ चे ०६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, प्लॉट नं. ७३, मिसाळ ले–आऊट, प्रज्ञादिप बुध्द विहार जवळ राहणारे फिर्यादी भोजवंत युवराज खोब्रागडे, वय ६० वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलूप लावून परित्राण पाठ कार्यक्रमाकरीता बाहेरगावी गेले

असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कडी–कोंडा तोडून, घरात प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख १,९७,२२५/–रू. चोरून नेले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. आकाश महल्ले ९०६७६३९४३५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.